# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई
जानेवारी - एप्रिल २०१०     वर्ष ३  अंक १     पृष्ठे ८     रु. २/-

## सौंदर्य हे कधीही कालबद्ध नसते

जगाच्या या भागात फारसा पाऊस पडत नाही. वर्षातून फार तर पंधरा ते वीस इंच पडत असावा. या पावसाचे येथे फार स्वागत होते, कारण मग संबंध वर्षभर पाऊस पडत नाही. त्यावेळी पर्वतावर बर्फ असतो. उन्हाळ्यात आणि शरद ऋतूमध्ये हे उघडे-बोडके, ओसाड, उन्हाने तापलेले, खडकाळ आणि भेसूर दिसतात. फक्त वसंतात ते सौम्य आणि स्वागतशील असतात. तेथे अस्वल, हरिण, रानमांजर, लावा पक्षी आणि अनेक साप असत. परंतु आता ते नाहीसे होऊ लागले आहेत. कारण भयानक मानव आता अतिक्रमण करू लागला आहे. येथे नुकताच काही काळ पाऊस पडून गेला होता. दरी हिरवीगार झाली होती, नारिंगाच्या झाडांना फळे आणि फुले आली होती. खेड्यापासून  दूर अशी ही एक शांत, सुंदर दरी आहे. कबुतराचा करुण स्वर येथे ऐकायला येत होता. वातावरण हळूहळू नारिंगाच्या बहराने सुगंधित झाले होते आणि थोड्याच दिवसात जेव्हा उबदार ऊन असेल आणि वारा सुटत नसेल तेव्हा तर हा सुगंध खूपच दरवळेल. ही दरी संपूर्णपणे पर्वत आणि टेकड्यांनी वेढली गेली आहे. टेकड्यांच्या पलीकडे समुद्र आहे; आणि पर्वतापलीकडे वाळवंट आहे. उन्हाळ्यात तेथे असह्य गरम होईल. परंतु वेड्यासारख्या गजबजलेल्या वस्तीपासून आणि त्यांच्या शहरांपासून दूर असल्याने या ठिकाणी सदैव सौंदर्य असते. रात्री तेथे विपुल आणि भेदक अशी विलक्षण शांतता असते. प्रयत्नपूर्वक अभ्यासाने वाढवलेले ध्यान सौंदर्याची विटंबना करते. सौंदर्याच्या आनंदाने प्रत्येक पान आणि फांदी बोलकी झाली होती आणि उंच, काळाशार सायप्रस वृक्ष त्या आनंदात शांत होता; गाठीगाठीचे जुने मिरीचे झाड त्या आनंद ओघासमवेत प्रवाहित होते.



तुम्ही आनंदाला बोलावू शकत नाही. आमंत्रित करू शकत नाही. कारण असे केले तर ते सुख बनते. सुख म्हणजे विचारांचा व्यापार आहे; आणि विचार कधीही कोणत्याही प्रकारे आनंदाची जोपासना करू शकत नाही आणि जे आनंददायी आहे त्याचा जर विचाराने पाठलाग केला तर ते फक्त स्मृतिरूप, एक मृत वस्तू म्हणून राहते. सौंदर्य हे कधीही कालबद्ध नसते. ते कालापासून पूर्णपणे मुक्त असते; आणि म्हणून संस्कृतीपासूनही मुक्त असते. जेव्हा 'स्व' नसतो तेव्हा ते असते. 'स्व' हा कालाने, विचारांच्या व्यापाराने, ज्ञानाने आणि शब्दांनी बद्ध असतो. 'स्व'च्या त्यागात, त्या संपूर्ण अवधानात सौंदर्याचा गाभा असतो. 'स्व' ला दूर सारणे ही अभिलाषा-इच्छाशक्तीची विचारपूर्वक क्रिया नसते. इच्छेला दिशा असते; आणि म्हणून ती प्रतिकार करणारी, विभाजन करणारी असते आणि म्हणून गोंधळ निर्माण करते. 'स्व'चे विसर्जन म्हणजे 'स्व'च्या ज्ञानाची उत्क्रांती नव्हे आणि कारणीभूत असणारा घटक म्हणून काल तेथे असत नाही. 'स्व'चा शेवट करण्याचा कोणताही मार्ग वा पद्धत नाही. समग्र आंतरिक अक्रियता हेच सौंदयांचे सकारात्मक अवधान असते.

तुम्ही एकमेकांशी संबंधित असलेल्या कृतींचे प्रचंड जाळे तयार केले आहे; आणि त्यात तुम्ही सापडला आहात. तुमचे मन संस्कारबद्ध होऊन त्याच पद्धतीने आत कार्य करीत आहे. ध्येयसिद्धी मग सर्वात महत्त्वाची बनते, त्यासाठी लागणारा जोराचा त्वेष हा 'स्व'चा सांगाडाच असतो. म्हणून तुम्ही तुमच्या गुरुंना, रक्षणकर्त्याला, श्रद्धांना आणि ध्येयवादाला अनुसरता; आणि मग प्रज्ञाजागृतीची, सावधानतेची जागा दृढविश्वास घेतो. जेव्हा 'स्व' नसतो तेव्हा प्रार्थना, धार्मिक विधी यांची गरज नसते. तुमच्या सांगाड्यातील रिकाम्या जागा तुम्ही ज्ञानाने, प्रतिमांनी, अर्थहीन कृतींनी भरून काढता आणि 'स्व' ला जिवंत ठेवता.

जे शाश्वत सौंदर्य असते, ते मनाच्या नीरव स्तब्धतेत न बोलाविता, न शोधता, ओळखीचा संकेत न करता येते.

*कृष्णमूर्तींची रोजनिशी*, प्र. ४१, ८ एप्रिल १९७५

## संपादकीय

सुंदर कशाला म्हणायचे ? सौंदर्य म्हणजे काय ? सौंदर्याची व्याख्या करणे चुकीचे आहे. किंबहुना कुठल्याही भाववाचक नामाला व्याख्या नसते. कारण ते काहीतरी शब्दात पकडता न येणारे 'वाटणे' असते. ती एक मनाची अवस्था असते. निर्विकल्प मन सुंदर असते, आणि सौंदर्याची जाण, ओळख त्यालाच होऊ शकते. जगात अनेक गोष्टी असतात ज्या साक्षात्काराच्या प्रकाशात दिसतात आणि संवेदनशील मनाला तिथेच सौंदर्याचा प्रत्यय येतो.

खूप अमूर्तात जाण्यापूर्वी एक साधा अनुभव. आपण जर भयग्रस्त असू किंवा मत्सराने, रागाने बेभान झालो असू तर त्या अवस्थेत सुंदर फूल सुंदर दिसू शकेल का ? सौंदर्य दिसायला ज्याच्या आत कुठेही आकस, संशय नाही, असे सुंदर मोकळे मन हवे. बाहेरील प्रकाश, अंधार, आवाज, निशब्दता, हवेची हालचाल, तिची स्थिरता त्या मनात मुक्त प्रवेश करतात. अशा वेळी समोरील कलाकृतीतील सौंदर्य दिसेल. निसर्गाने आपले द्वार उघडून समोर एखादे सुंदर फूल, एखादे पर्वतशिखर, एखादी पावसाची सर, धबधबा, नदी, समुद्र, त्याच्या विविध आकार घेणाऱ्या लाटा अशा अनंत गोष्टी ठेवल्या आहेत. हे बघायला ते मन हवे. जरी सुंदर वस्तू, कलाकृती, कलावंत हे निमित्त होत असले तरीही आपण सौंदर्य म्हणतो ते ह्या गोष्टींवर अवलंबून नसते.

कलाकृती हे सृजनशील मनाचे शब्दात, चित्रात प्रकटीकरण असते. उपजत देणगी असेल तर सराव व साधनसामग्रीच्या साहाय्याने कलाकृतीची गुणवत्ता वाढू शकते. परंतु ज्याचे शब्दात किंवा चित्रात प्रकटीकरण होत नसेल असे सुप्त सृजनशील मन देखील असते. ते तुमच्या आमच्यासारख्या सामान्य माणसातही असते. ते कवितेशिवायचे कविमन असते जी सौंदर्याची अनुभूती असते. तिचा कलाकृती, त्यातून निर्माण होणारी प्रतिष्ठा, पैसा ह्यांच्याशी काहीही संबंध नसतो.

सौंदर्याच्या भावनेचा उगम मानवी मनात झाला असावा. उत्क्रांत मानवी मनाला सौंदर्याच्या आनंदाची जाणीव झाली असावी. त्या आनंदाला मानवी विचाराने नाव दिले. आकाशात संथ झेपावणारा पक्षी त्यात मशगुल असतो. त्याच्याकडे तो अनुभव गोठवणारे शब्द नसतात. कारण तेथे अनुभवणारा नसावा. कृष्णमूर्ती एकीकडे विचारतात, ''बघणाऱ्याचा संपूर्ण अभाव म्हणजे ते सौंदर्य आहे का ?''

जेव्हा बघणारा प्रभावी होतो तेव्हा तो सौंदर्य पकडून ठेवायचा प्रयत्न करतो. वासना, लालसा, ईर्ष्या निर्माण होतात तेव्हा सौंदर्य हरवते. सुंदर देखावा पाहून तो फोटोत गोठवण्याची इच्छा होते तेव्हा तेथे सौंदर्य पाहणारे मन उरत नाही. करोडो रुपयांना कलाकृती विकल्या जातात, त्यांचा लिलाव होतो. सौंदर्य ही उपभोगाची गोष्ट होते तेथे सौंदर्य नसते. सुंदर गाणारा त्याच्या लयीत तन्मय होऊन गातो आणि ऐकणारा त्याच तन्मयतेने ऐकतो. दोघांच्या तन्मयतेची पातळी एक होते. तिथे उपभोग नसतो. फक्त सौंदर्य असते. तेथे प्रतिसादाची, परिणामाची, गौरवाची अपेक्षा नसते. ध्यानमग्न होऊन सौंदर्यात भिजणारी दिव्य मने असतात.

जेव्हा 'मी'च्या सीमा अदृश्य होतात तेव्हा बघणारा निष्प्रभ होतो. निसर्गाच्या सान्निध्यात ही एक संधी असू शकते. आपण जेव्हा समुद्र किनारी उभे असतो, कल्पनेत न सामावणारा तो पाण्याचा प्रचंड साठा, दूरवर आकाशाचे निळेपण आणि पाण्याचे निळेपण त्यामध्ये क्षितीजाची ती स्पष्ट रेखा पाहतो, तेव्हा मनाच्या सीमा अस्पष्ट होऊ लागतात. तेथे सौंदर्य असते. एखाद्या रस्त्याच्या कडेच्या रानफुलावर नजर पडते, त्या मुलायम पाकळ्या, ते रंगांचे विलक्षण मिश्रण, तो नाजुकपणा, ती सूक्ष्मता हे पाहताना तेथे पाहणारा नसतो, पुढ्यात तो नजराणा असतो. तेथे सौंदर्याशिवाय काय असू शकणार ?

कृष्णमूर्तींनी एक सुंदर प्रश्न विचारला आहे ''अशी काही मनाची अवस्था आहे का जिला सुंदर म्हणता येईल, जी प्रतिक्रियांचा निष्कर्ष नसेल ?'' ह्या प्रश्नाला सुंदर म्हणावेसे का वाटले हे सांगणे कठीण आहे. कदाचित निरागस, निष्कर्षविरहीत मनाची झलक भासली असावी.

त्या सुंदर प्रश्नाचे उत्तर आपल्याजवळ नसेल पण तो प्रश्न घेऊन कृष्णमूर्तींच्या बरोबर ह्या अंकातून प्रवास करायचा प्रयत्न आहे.

## सत्याचे सौंदर्य आणि पाषाणाचे सौंदर्य या दोन भिन्न गोष्टी आहेत

धर्म म्हणजे अंधश्रद्धा, मूर्तिपूजा, भोंगळ समजुती आणि धार्मिक विधी झाला आहे. तो सत्याचे सौंदर्य हरवून बसला आहे. वास्तवाची जागा धूपबत्तीने घेतली आहे. प्रत्यक्ष बोधाऐवजी त्याची जागा हाताने वा मनाने कोरलेल्या प्रतिमेने घेतली आहे. धर्माच्या दृष्टीने एकमेव महत्त्वाचे आहे ते मानवाचे संपूर्ण परिवर्तन. धर्माच्या नावाने चाललेली ही सगळी कसरत म्हणजे केवळ मूर्खपणा आहे. म्हणून कितीही सुंदर असली तरी त्या कोणत्याही सुंदर देवालयात, चर्चमध्ये वा मशिदीत सत्य सापडत नाही. सत्याचे सौंदर्य आणि पाषाणाचे सौंदर्य या दोन भिन्न गोष्टी आहेत. एकामुळे अनंताचा साक्षात्कार होतो आणि दुसऱ्यामुळे माणूस कैदी बनतो, एकामुळे मुक्तीचे द्वार खुलते आणि दुसऱ्यामुळे वैचारिक बंधनात माणूस अडकतो. स्वप्नरंजन आणि भावनात्मकता या दोन्ही गोष्टी धर्माच्या खऱ्या स्वरूपालाच नाकारतात, तसेच धर्म म्हणजे काही बुद्धीचा खेळही नव्हे.

कृतीच्या क्षेत्रात कार्यक्षमतेसाठी आणि वस्तुनिष्ठतेसाठी ज्ञानाची आवश्यकता असते. परंतु ज्ञान म्हणजे मानवाच्या परिवर्तनाचे साधन नव्हे. ज्ञान म्हणजे विचारांचीच संरचना आणि विचार कितीही सुधारित आणि विकसित असला तरी ज्ञाताचीच नीरस पुनरावृत्ती. विचार आणि ज्ञातावाटे मुक्ती संभवत नाही...

...सत्याचे सौंदर्य आणि तरलता श्रद्धेत नाही किंवा विशिष्ट शिकवणीत नाहीत. माणूस शोधून काढील अशा ठिकाणी ते नसते कारण सत्याच्या सौंदर्याला काही मार्ग नसतो. त्याचे एखादे पक्के केंद्रस्थान नसते वा त्याचे आश्रयस्थानही नसते. त्याला स्वत:चेच मार्दव असते, ज्याचे प्रेम मोजण्यासारखे नसते, धरून ठेवण्यासारखे नसते, अनुभवण्यासारखे नसते, त्याला बाजारू किंमत नसते. वापरून दूर सारावी अशी ती वस्तू नसते. जेव्हा मन आणि हृदय विचारांच्या गोष्टींपासून रिक्त असते तेव्हाच ते सौंदर्य तेथे असते. एखादा साधू वा भिकारी त्याच्या निकट नसतो, श्रीमंतही त्याच्याजवळ नसतो; वा विद्वान किंवा नैसर्गिक देणगी असलेला माणूसही त्याला स्पर्श करू शकत नाही. जो म्हणतो की त्याला हे समजले आहे, तो तर त्याच्या जवळ कधीही पोहोचलेलाच नसतो. जगातच राहूनही जगाला दूर ठेवा.

*कृष्णमूर्तींची रोजनिशी,* प्र. १३, २७ सप्टेंबर, १९७३

## सौंदर्याचा आपल्या दैनंदिन जीवनाशी काय संबंध?

आपण एकत्रपणे पाहिले पाहिजे की सत्य म्हणजे काय आणि असत्य म्हणजे काय. कोणी आपल्याला सांगायला नको की असत्य काय किंवा सत्य काय, अज्ञान काय आहे किंवा ज्ञान म्हणजे काय, तर आपल्यामध्येच आपण एक शांत-निवांत कोपरा धुंडाळला पाहिजे. या अगदी भयानक अशा शहरात राहताना, लहानशा जागेत राहताना, सबंध दिवसभर काम करताना, बसमधून आणि लोकल रेल्वेने दूरदूरच्या अंतरावरून येताना, प्रवास करताना, आपण स्वत:साठीच एक कोपरा शोधला पाहिजे, घरामध्ये नाही किंवा बागेतसुद्धा नव्हे किंवा मोकळ्या गल्लीतदेखील नव्हे तर आपल्याच सखोल अशा गहनतेमध्ये- आणि तेथून सुरुवात केली पाहिजे, कृती केली पाहिजे आणि स्वत:साठीच शोधून काढले पाहिजे की, सौंदर्य म्हणजे काय, काल म्हणजे काय, भीतीचे स्वरूप आणि हालचाल, सुखाचा पाठलाग आणि दु:खाचा अंत ह्या साऱ्याचा शोध. आपल्यामध्ये असा कोपरा असलाच पाहिजे. आपल्या मनात नव्हे तर हृदयात, कारण मग तिथे प्रेम आणि प्रीती असते, बुद्धि, आकलन असते मग तेथे स्पष्टता येते आणि तेथून कृती घडते. परंतु आपल्यापैकी बहुतेकजण असे इतक्या कटकटीचे आणि संघर्षमय जीवन जगत असतात.आपल्याभोवती अतिशय तणाव असतो. जर आपल्याला आपल्या आतमध्ये काहीतरी अवकाश मिळाला नाही, विचाराने निर्माण केलेला अवकाश नव्हे, प्रदूषित न झालेला अवकाश, स्वच्छ, स्पष्ट ज्यामध्ये प्रकाश आहे जो कोणी दुसऱ्याने प्रज्वलित केलेला दीप नसतो, आपला स्वत:चाच प्रकाश असतो. म्हणजेच मग आपण पूर्णपणे मुक्त असतो. आपण मुक्त माणसे नाही आहोत. आपल्याला वाटते की आपण मुक्त आहोत. आपल्याला वाटते की, आपण निवड करू शकतो. आपल्याला जे पाहिजे ते आपण करू शकतो, म्हणजे आपण मुक्त आहोत. परंतु मुक्ती ही आपल्याला जे पाहिजे ते करण्याच्या इच्छेपासून एक पूर्णपणे निराळी गोष्ट आहे. म्हणून आपण कुठच्याही बाहेरील संस्थेशिवाय, मदतीविना, मार्गदर्शनाशिवाय एकत्रितपणे आपल्यासाठीच शोधून काढले पाहिजे की काय करावे, कसे वागावे, योग्य कृती म्हणजे काय, आणि आपल्यामध्येच अशी एक जागा शोधून काढली पाहिजे की जिला सुरुवात नाही आणि अंत नाही.

पहिल्या प्रथम सौंदर्य म्हणजे काय ? तुम्ही विचाराल की त्याचा आपल्या दैनंदिन जीवनाशी काय संबंध ? आपले दैनंदिन जीवन म्हणजे बऱ्यापैकी गलिच्छ, स्वार्थी असते. आपले दैनंदिन जीवन म्हणजे संघर्ष, दु:ख, काळज्या आणि ती निराशाजनक एकाकीपणाची भावना. हेच आपले रोजचे जीवन आहे. ते समजून घेण्यासाठी आपल्याला ते पाहण्याची एक सूक्ष्म दृष्टी पाहिजे. जे प्रत्यक्ष घडत आहे ते पाहणे. आपल्या जीवनाचा एक घटक म्हणजे काल. आपण आता शोधून काढणार आहोत की, काल म्हणजे काय. कालाची आपल्या जीवनात कोणती भूमिका असते आणि काल - म्हणजे जो विभाजनाची प्रक्रिया असतो, काल ज्याची सुरुवात असते आणि शेवट असतो, काल ज्यामध्ये काहीतरी बनणे असते तो काल, जो कालगणनाक्रमाहून निराळा असतो, जो सूर्याच्या उगवण्या-मावळण्याहून निराळा असतो, पौर्णिमेच्या चंद्राचे सौंदर्य, प्रतिपदेच्या चंद्राची कोर, या साऱ्यापासून वेगळा असा काल - मार्ग म्हणून त्या कालात सौंदर्य सामावलेले असते की नसते, हे आपल्याला समजून घेणे महत्त्वाचे आहे कारण आपण सौंदर्यदृष्टीने जगण्याच्या सर्व संवेदना हरवून बसलो आहोत. नैसर्गिक सौंदर्याची दृष्टीच आपण गमावलेली आहे. फक्त चेहऱ्याचे सौंदर्य किंवा कापडाच्या निवडीमध्ये असलेली चांगली अभिरुची हे सारे नव्हे, तर सौंदर्याचे गुणतत्व. जीवनाशिवाय सौंदर्य असूच शकत नाही, सौंदर्य हे कालामधून आलेले नसते. सृजन ही कालाची निर्मिती नसते.

*Mind Without Measure*, मुंबई १९८३, भाषण ३

## तो नादच मानवी हृदयाचे द्वार अश्रूंसाठी आणि सौंदर्यासाठी मोकळे करतो

इतक्या लवकर सकाळीही सूर्य प्रखर आणि तापलेला होता. वाऱ्याची किंचितही झुळूक नव्हती आणि एक पानदेखील हालत नव्हते. त्या प्राचीन देवालयात थंडगार आणि प्रसन्न वाटत होते. अनवाणी पायांना खडकाच्या भरीव चिपा, त्यांचे आकार आणि त्यांचा खडबडीतपणा जाणवत होता. हजारो लोक, हजारो वर्षे त्यावर चालले असतील. प्रात:कालच्या सूर्याच्या झगमगाटानंतर तेथे अंधार होता. त्या सकाळी देवालयातील पडव्यांमध्ये खूप कमी लोक दिसत होते; आणि अरुंद बोळांमध्ये आणखीन अंधार होता. हा बोळ पुढे देवालयाच्या गाभाऱ्याकडे जाणाऱ्या रुंद मार्गाला मिळत होता. तेथे फुलांचा सुगंध होता आणि अनेक शतकांचा धूपबत्तीचा गंध होता आणि आता शेकडो ब्राह्मण सुस्नात होऊन, नवे, पांढरे धूत वस्त्र नेसून सुस्वर प्रार्थना म्हणू लागले होते. संस्कृत ही अत्यंत सखोल, प्रभावी आणि नादपूर्ण भाषा आहे. शेकडोंच्या अशा पठणाने देवालयाच्या भिंती कंपायमान पावत होत्या, जवळजवळ हालतच होत्या. त्या आवाजातील गांभीर्य आणि भारदस्तपणा चकित करणारा, अविश्वसनीय होता; आणि त्या क्षणाचे पावित्र्य शब्दातीत होते. ही अथांगता शब्दांमुळे जागृत झाली नव्हती. तर हजारो वर्षे या भिंतींच्या आत धारण केलेल्या नादब्रह्माच्या गांभीर्यामुळे आणि त्यापलीकडील अमर्याद अवकाशामुळे आली होती. हे शब्दांच्या अर्थवत्तेमुळे वा स्पष्ट शुद्ध शब्दोच्चारामुळे किंवा देवालयाच्या सौंदर्यामुळे नव्हे तर मानवी मनाच्या भिंती आणि मर्यादा भेदणाऱ्या आवाजाच्या गुणवत्तेमुळे घडले होते. पक्षांचे कूजन, दूरवरच्या बासरीची धून, पानामध्ये सळसळणाऱ्या वाऱ्याची झुळूक, हे सारे माणसांनी स्वत:साठी निर्माण केलेल्या भिंती मोडून टाकतात.

मोठमोठ्या चर्चमध्ये, सुंदर मशिदींमध्ये एका सुरात गायलेल्या प्रार्थना आणि पवित्र ग्रंथाचे लयबद्ध वाचन यांमध्ये तो नादच मानवी हृदयाचे द्वार अश्रूंसाठी आणि सौंदर्यासाठी मोकळे करतो. अवकाशाशिवाय सौंदर्य नाही. अवकाश नाही तर फक्त भिंती आणि मोजमाप तुमच्याजवळ राहातात. अवकाश नाहीतर गहनता नाही, अवकाश नाही तर आत आणि बाहेरही निव्वळ दारिद्र्य राहाते. तुमच्या मनात एवढीशी छोटीशी जागा, छोटेसे अवकाश आहे; त्यात इतके शब्द, इतक्या आठवणी, इतके ज्ञान, इतके अनुभव आणि इतके प्रश्न ठासून भरलेले असतात की तेथे काही अवकाश, जागा उरलेली नसतेच. फक्त विचारांचा कधीही न संपणारा कलकलाट असतो आणि तुमची संग्रहालयेही भरलेली असतात आणि प्रत्येक कपाटात पुस्तकेही असतात. नंतर करमणुकीच्या जागा, धार्मिक जागा वा अन्य जागाही तुम्ही व्यापून टाकता, किंवा दु:ख आणि दुराचार यांच्या अरुंद जागेत तुम्ही स्वत:भोवती भिंती उभारता. आत किंवा बाहेर अवकाश नसेल तर तुम्ही हिंसक आणि दुष्ट बनता.

राहण्यासाठी, खेळण्यासाठी, सुस्वर प्रार्थनेसाठी, प्रत्येक गोष्टीसाठी जागा लागते. जे पवित्र आहे ते जागेशिवाय, अवकाशाशिवाय राहू शकत नाही. जेव्हा तुम्ही काही धरू पहाता, जेव्हा तुम्ही दु:खी असता, जेव्हा तुम्ही विश्वाचे केंद्र बनता तेव्हा तुमच्याजवळ अवकाश नसतो. तुम्ही जी जागा व्यापता ती जागा विचारांनी तुमच्याभोवती बांधलेली जागा असते; आणि तेथे दु:ख आणि गोंधळ असतो, विचार जी जागा मोजतो ती तुम्ही आणि मी, आपण आणि ते, ह्यातील विभाजन असते. विभाजन म्हणजे अनंत यातना.

तेथे त्या विशाल, मोकळ्या, हिरव्यागार शेतात एकाकी झाड उभे आहे.

*कृष्णमूर्तींची रोजनिशी*, प्र. ३६, १ एप्रिल १९७५

### शिवाजीपार्क नागरिक संघातील कार्यक्रम

कृष्णमूर्ती फाउंडेशन, मुंबई केंद्राच्या वतीने शिवाजीपार्क येथील नागरिक संघाच्या सभागृहामध्ये कृष्णमूर्तींच्या इंग्रजी तसेच भाषांतरित मराठी, हिंदी, गुजराती पुस्तकांचे तसेच DVD/MP3s चे प्रदर्शन ३०–३१ ऑक्टोबर या दिवसात भरविले होते.

या प्रदर्शना दरम्यान कृष्णमूर्तींच्या काही DVDs दाखविल्या गेल्या. प्रदर्शनाच्या शेवटी *The Seer Who Walks Alone* हा कृष्णजींच्या जीवनावरीत माहितीपट दाखविला. या प्रदर्शनाला फारच चांगला प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे अनेक तरुण मुलांनी या प्रदर्शनाला भेट दिली.

या प्रदर्शनाच्या निमित्ताने रुपारेल महाविद्यालयातून आलेल्या प्राध्यापकांनी माहितीपट त्यांच्या महाविद्यालयातील तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी आम्हाला निमंत्रित केले.

### रुपारेल महाविद्यालयातील कार्यक्रम

नोव्हेंबरला हा कार्यक्रम रुपारेलच्या तत्त्वज्ञान विभागाच्या विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी आयोजित केला होता

फाउंडेशनतर्फे प्रमुख वक्ते म्हणून वासंतीताई पडते आणि अभिजित पडते आले होते.

प्रथम कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी फाउंडेशनमधून आलेल्या मंडळींचे स्वागत केले. त्यानंतर अभिजित पडते यांनी कृष्णजींच्या शिकवणीविषयी उपस्थितांना परिचय करून दिला. विशेषत: कृष्णजींचा शिक्षणविषयक दृष्टीकोन विषद केला. शिकणे म्हणजे स्मृतीमध्ये ज्ञान गोळा करणे नव्हे तर ते शिकणे प्रत्यक्ष आचरणात उतरले पाहिजे. त्या शिकण्याचा आणि जगण्याचा संबंध असला पाहिजे. आजचे शिक्षण केवळ परिक्षार्थी निर्माण करतात. आजच्या शिक्षणाचा व जगण्याचा संबंध उरलेला नाही. त्यामुळे आपल्या दैनंदिन जीवनातील नातेसंबंधांमध्ये ताणतणाव निर्माण झालेले आहेत.

यानंतर *The Seer Who Walks Alone* ही फिल्म दाखविण्यात आली. अभिजित आणि वासंतीताई यांचा विद्यार्थ्यांशी त्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत अशी प्रश्नोत्तरे झाली.

आपण मनमोकळे का नसतो. आई–वडिलांशी विद्यार्थ्यांचे संबंध का ताण–तणावाचे असतात, स्पर्धेशिवाय, तुलनेशिवाय आजच्या जगात जगात येईल का ? पैसा, प्रतिष्ठा हीच आमच्या जगण्यातील प्रमुख मूल्ये का झाली आहेत. स्वार्थाशिवाय माणूस कसा जगू शकेल ? अशा जीवनातील आजच्या प्रमुख समस्यांवर विशेषत: तरुणांच्या समस्येवर समर्पक प्रश्नोत्तरे झाली. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला.

### रचना – संसद येथील कार्यक्रम

प्रभादेवी येथील रचना संसद या कला विद्यालयात ६ नोव्हेंबर २००९ रोजी तेथील वास्तुशास्त्राच्या विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधण्याचा कार्यक्रम कृष्णमूर्ती फाउंडेशनतर्फे करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून फाउंडेशनतर्फे डॉ. सतीश इनामदार आले होते आणि विषय होता 'तुम्ही आपल्या आयुष्याचं काय करीत आहात ?' या कार्यक्रमाला सुमारे १०० विद्यार्थी हजर होते.

कार्यक्रमाची सुरुवात करताना डॉ. सतीश यांनी आजच्या विद्यार्थी अस्वस्थतेच्या कारणांचा शोध घेतला. परीक्षेचा प्रचंड ताण, स्पर्धा, एकमेकांशी तुलना, महत्त्वाकांक्षा, पैसा हेच एकमेव उद्दिष्ट, आई–वडिलांकडून अपेक्षा अशा अनेकविध दबावाखाली आजचा विद्यार्थी सापडलेला आहे. त्याला आपल्या आयुष्यात पैसा पाहिजे की प्रतिष्ठा, की जीवनातील निर्भेळ आनंद याचं भान राहिलेलं नाही. त्यामुळे आजचा विद्यार्थी चंगळवादाकडे भरकटला जातो आहे. त्याला योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी ना शाळेकडे व्यवस्था, ना विद्यालयात किंवा कुटुंबात आधार सापडत आहे. त्यामुळे लैंगिकता, मनोरंजन, व्यसनाधीनता यांना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आहे आणि या सर्वांमधून आपण पुढे कुठे जाणार आहोत याची निश्चिती नाही. जगातील अनेक देशातील विद्यार्थी वर्गाची स्थिती याहून निराळी नाही. ह्या साऱ्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

त्यांच्या या अर्धा तास चाललेल्या मर्मभेदी भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांसमोर जणु एक आरसाच ठेवला ज्यात ते विद्यार्थी स्वत:चे प्रतिबिंब पाहू शकत होते. आणि त्यानंतर झालेल्या उत्स्फूर्त प्रश्नोत्तरांमधून विद्यार्थ्यांच्या मनाला हे प्रश्न भिडल्याचे प्रत्यंतर दिसून आले.

आजूबाजूच्या समाजात प्रत्येक क्षेत्रामध्ये चाललेल्या जीवघेण्या स्पर्धेमध्ये आपण पडलो नाही तर आपला कसा निभाव लागेल? येथपासून ते नोकरीसाठी करावी लागणारी धडपड, कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी असलेला भ्रष्टाचार, महत्त्वाकांक्षेशिवाय आज आम्हाला कसं पुढे येता येईल याबद्दलचा संभ्रम असे उत्स्फूर्त प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारले आणि त्याला डॉ. सतीश यांनी समर्पक उत्तरे दिली.

समारोपाच्या वेळी श्री. आडारकर यांनी यापूर्वी कधीही त्यांच्या विद्यार्थ्यांनी असा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला नव्हता असे म्हणून या कार्यक्रमाची प्रशंसा केली आणि कृष्णमूर्तींचे शिक्षणविषयक व्हिडिओ शोज् या कॉलेजमध्ये झाले पाहिजेत असे सुचविले. त्यांच्या आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला.

---

फुलाच्या सौंदर्यात एक आंतरिक सामर्थ्य असते. मग त्या फुलाला कुणी विसरून जावो, कुणाकडून ते बाजूला टाकले जावो की कुणाकडून ते चुरगळले जावो.

महत्त्वाकांक्षी मनुष्याला सौंदर्य जाणवत नाही. सारभूताचा स्पर्श म्हणजेच सौंदर्य...

...उत्कटतेचा व संवेदनशीलतेचा परमोच्च बिंदू गाठणे म्हणजेच सारसर्वस्व अनुभविणे. हेच शब्दाच्या व भावनेच्या पलीकडे वसणारे सौंदर्य असते. प्रमाणबद्धता व गहनता, छाया व प्रकाश या गोष्टी दिक्कालांनी मर्यादित केल्या जात असतात. त्या सुंदर–असुंदर अवगुंठनात वावरत असतात, पण जे रेषा व आकार यांच्या पलीकडचे असते, ज्ञानाच्या व ग्रहण करण्याच्या पलीकडचे असते, तेच सारसर्वस्वाचे सौंदर्य असते.

*दैनंदिनी,* १८ जून १९६१

# सौंदर्य म्हणजे काय ते आपण कसं शोधून काढणार?

सत्यम् शिवम् सुंदरम् – चांगुलपणा, सत्य आणि सौंदर्य यांमध्ये काही फरक आहे का ? त्या तिन्ही गोष्टी निराळ्या आहेत का ? की एकच गोष्ट जी निरनिराळ्या नावाने संबोधली जाऊ शकते ! सत्य, चांगुलपणा किंवा सौंदर्य समजून घेण्यासाठी आपण आतापर्यंत आपल्या इच्छांना दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. शिस्त लावण्याचा, त्यांना ताब्यात ठेवण्याचा किंवा इच्छांना दुसरा पर्याय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. आपली इच्छा अत्यंत कृतीशील आहे, कृतीमध्ये अगदी स्फोटक आहे हे पाहिल्यानंतर आणि मग ती इच्छा असामान्य दु:ख घेऊन येते, वेदना आणि आनंद आणते हे पाहिल्यानंतर मग आपण म्हणतो की, आपण इच्छेपासून मुक्त झाले पाहिजे. तेच तर सर्व धर्मांनी सांगितले आहे की सत्य– सौंदर्य– चांगुलपणाचा शोध घेण्यासाठी आपण वासनामुक्त झाले पाहिजे. म्हणून अनेक शतकांमधून आपण वासनांचे दमन करण्याचा प्रयत्न केला आहे आणि या इच्छा, वासनांच्या दमन करण्याच्या प्रक्रियेमध्येच आपण चांगुलपणा, सत्य, सौंदर्य आणि संवेदना हरवून बसलो आहोत. सौंदर्य म्हणजे काय ? तो खरंच एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे आणि त्या विषयी पुस्तकं लिहिली गेली आहेत. परंतु तुम्ही आणि मी, जी अगदी साधी माणसं आहोत, जे हुशार आणि विद्वान नाही, ज्यांना सौंदर्य म्हणजे काय ते शोधून काढायचे आहे, ते आपण कसं शोधून काढायचं ? सौंदर्य म्हणजे काय ते आपण कसं शोधून काढणार, शाब्दिक किंवा सिद्धांतामधून नव्हे, परंतु प्रत्यक्ष ज्याला सौंदर्य म्हणतात त्या असामान्य भावनेची जाणीव होण्यासाठी.

आपल्यापैकी बहुतेक जण सौंदर्याला एक तयार केलेली वस्तू किंवा एकत्रित आणलेली वस्तू म्हणून ओळखतो, हो की नाही ? कारण आपल्यापैकी बहुतेक जणांसाठी सौंदर्य ही एक प्रतिक्रिया असते, प्रतिसाद असतो आणि मी स्वत:लाच विचारतो आहे, तिथे एक अशी भावना आहे का की जिला सौंदर्य, चांगुलपणा किंवा सत्य म्हणता येईल आणि जी प्रतिसाद असणार नाही, केवळ प्रतिक्रिया नसेल ?

मी ते झाड पाहतो आणि म्हणतो की ते किती सुंदर आहे. ते झाड ही एक अशी वस्तू आहे की ती निर्माण केलेली आहे आणि मी त्याला प्रतिसाद देतो. मी ते सुंदर आहे असे म्हणतो आणि जवळून निघून जातो. तसेच मी ती इमारत पाहतो, पुन्हा ती एक अशीच एकत्रित केली गेलेली वस्तू आहे आणि मी म्हणतो ती किती वाईट आहे. तो सुद्धा एक प्रतिसादच असतो. सौंदर्य म्हणजे काहीतरी निर्माण केलेल्या एखाद्या वस्तूबद्दल केवळ प्रतिक्रिया किंवा प्रतिसाद असतो का ? किंवा तिथे एक अशी मनाची अवस्था असते की जिला सुंदर म्हणता येईल आणि जी प्रतिक्रियेचा परिणाम असणार नाही.

काही झाले तरी आपली मने आव्हानाच्या किंवा प्रतिक्रियेच्या परिणामांनी बनलेली असतात. आणि म्हणून आव्हानाला अपुरा प्रतिसाद असतो. आणि म्हणून तिथे संघर्ष असतो, दु:ख असते. या सर्व प्रक्रियेच्या पायावर मन हे विशाल किंवा अतिसंकुचित बनलेले असते. म्हणून मी जेव्हा झाड बघतो, एक पक्षी, सुंदर दिसणारी व्यक्ती, एक मूल पाहतो किंवा जेव्हा मी दारिद्र्य, गलिच्छपणा, वाईट इमारत पाहतो आणि म्हणतो की 'किती सुंदर' किंवा 'किती वाईट'– माझ्या प्रतिक्रियेच्या अनुषंगाने आणि ज्या प्रकारे मी अवधान देतो त्याप्रमाणे, जेव्हा मी पूर्णपणे सावध असतो, तेव्हा त्या संपूर्ण अवधानामध्ये प्रतिक्रिया असते का? आणि ज्यावेळी अवधानासाठी विषय–वस्तू असते तेव्हा अवधान असते का ? मित्रांनो, हे समजतंय का की हे फारच गुंतागुंतीचं होतंय. मला वाटत नाही की जर तुम्ही हे काळजीपूर्वक ऐकलत तर हे गुंतागुंतीचं आहे.

जसं मी म्हटलं आहे, एका वस्तूसाठी दिलेलं अवधान हे अवधान नसतंच मुळी कारण ती वस्तू तुमचा ताबा घेते. परंतु मी जर पूर्णपणे अवधानी असेन, माझ्या एकूण अस्तित्वासह, तर त्या अवस्थेमध्ये तिथे प्रतिक्रिया असते का ? त्या अवस्थेमध्ये ज्याला सुंदर किंवा वाईट म्हणता येईल असं काही असतं का ?

काही झालं तरी तिथे सैद्धांतिक सौंदर्य असते, आदर्शाने निश्चित केलेलं आणि अनुभवातून आलेलं सौंदर्य, अनुभवाचं सार. आता मी स्वत:लाच विचारतो आहे – आणि मला वाटतं की तो रास्त प्रश्न आहे – तिथे अशी काही अवस्था असते का की मन पूर्ण सावध असते आणि ते सौंदर्य आणि कुरुपतेबद्दलच्या स्वत:च्या प्रतिक्रिया समजून घेतं आणि त्याला सुंदर किंवा कुरुप म्हणत नाही ? कारण ते असे पूर्ण अवधान देत असते, ज्यामध्ये अनुभवाची पूर्णता एकवटलेली असते. आणि संपूर्ण अवधानाच्या अवस्थेमध्ये तिथे अशी एक व्यक्ती असते का की जी म्हणते, ''मी सौंदर्याचा अनुभव घेतला आहे किंवा मी कुरुपतेचा अनुभव घेतला आहे.'' की तिथे फक्त भावनाच असते, एक अनुभवणं, जी प्रतिक्रिया नसते, कारणाचा परिणाम नसतो ?

म्हणून मन – माणसाने एखाद्या शिल्पाकृतीमध्ये किंवा इमारतीच्या रूपाने निर्माण केलेल्या सौंदर्याप्रति किंवा कुरुपतेप्रति संवेदना न गमवता – त्या अवधानाची संपूर्णता अनुभवू शकतं का, ज्यामध्ये

## कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री (KFI)

**विशेष अध्ययन कार्यशाळा**

| | | | |
|---|---|---|---|
| १ ते ५ फेब्रुवारी २०१० | What is a Religious Life ? | १६ ते २२ मार्च २०१० | Freedom, Love and Intelligence |

**वार्षिक सम्मेलने**

| | | | |
|---|---|---|---|
| १५ ते १९ मे २०१० | मराठी संमेलन | २१ ते २५ मे २०१० | हिंदी संमेलन |

**संपर्कासाठी पत्ता :** संचालक, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र सह्याद्री, पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल - kscskfi@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

## आनंद विहार, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर

**संपर्कासाठी पत्ता :** आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे,
पिनकोड- ४२१५०३, महाराष्ट्र, दूरध्वनी : ८००७४३९७०३, (०२२) २५१५३०९४, २४२२३१९९ • ई मेल : zilog@vsnl.com

सुंदरता आणि कुरूपता असं द्वंद्व निर्माण होत नाही ? तुम्हाला समजतंय का ? निश्चितच ते मनच असतं जे संघर्षामध्ये असतं. ते आपणच निर्माण केलेल्या इच्छांमध्ये गुरफटलेलं असतं, आपल्या स्वत:च्या समाधानामध्ये किंवा निराशेमध्ये – ते फक्त असंच मन असतं जे ज्याला सुंदर आणि कुरूप म्हणतात, ते निर्माण करतं.

सभ्य गृहस्थहो, जसं मी म्हटले आहे, हा अगदी गुंतागुंतीचा प्रश्न आहे आणि त्याचं खरं आकलन होण्यासाठी, केवळ शाब्दिक नव्हे, तर सौंदर्य, चांगुलपणा किंवा सत्य म्हणजे काय ते समजून घेण्यासाठी, मन शब्द आणि त्या शब्दाच्या प्रतिक्रियेपासून मुक्त असलं पाहिजे, मगच तुम्हाला आढळून येईल की तेथे अनुभवाची समग्रता असते. आणि अनुभव घेणारा नसतो जो समग्रतेचा अनुभव घेत असतो. त्या अवस्थेमध्ये निर्मितीक्षमता असते जिचा अंतरविरोधी मनाच्या निर्मितीशी काही संबंध नसतो, मन जे इमारतीमधून, स्थापत्य कलेमधून, कविता, निबंध इ. साहित्यामधून मुक्त होण्याचा मार्ग शोधत असते. हे सर्व ऐकून तुम्ही म्हणाल की, 'तुम्ही सुद्धा समाधान मिळविण्यासाठी किंवा कुठेतरी मोकळं होण्यासाठी बोलत नाही का ?' मला असं वाटत नाही कारण खरा धार्मिक मनुष्य समाधान शोधत नसतो. जसं मी विषद केले आहे, इच्छापूर्तीच्या मातीतच दु:ख फोफावते.

मुंबई १९५७, भाषण ६

*सौंदर्य म्हणजे संपूर्ण सुव्यवस्था.* परंतु आपल्यापैकी बहुतेकांना आयुष्यातील या सौंदर्याचं आकलन होत नाही. आपण भलेही कोणी मोठे कलाकार, चित्रकार, विविध विषयातील तज्ज्ञ असू पण आपल्या स्वत:च्या दैनंदिन जीवनात मात्र आपल्या सर्व चिंतांसह आपण अत्यंत दुरवस्थेचे, अव्यवस्थेचे जीवन जगत असतो. हे एक सत्य आहे. तुम्ही महान शास्त्रज्ञ असाल, एखाद्या विषयाचे जाणकार असाल पण तुम्हाला तुमच्या स्वत:च्या समस्या, संघर्ष, दु:ख, चिंता असे सर्व काही असतेच. आपण एकच शोध घेत आहोत तो या गोष्टीचा की आपल्याला यातून अत्यंत व्यवस्थित, सुरळीत, व्यवस्थापूर्ण जीवन जगणे शक्य आहे का? शिस्त लादून नव्हे, तर या अव्यवस्थेची मूलभूत कारणे शोधून ती दूर करून, त्यांना पूर्णपणे नष्ट करता येईल का? तरच मग या विश्वात संतुलित व्यवस्थित जीवन जगता येईल...

...आपली ज्ञानेंद्रिये कशी कार्य करतात हे तुम्ही कधी निरखून पाहिलं आहे का ? एखाद्याला आपल्या सर्व ज्ञानेंद्रियांची एकत्रितरीत्या जाणीव होते का ? एकेकटे नव्हे – स्पर्श, चव, श्रवण, दर्शन – सर्व एकत्रितपणे जाणवते का ? तुमची सर्व ज्ञानेंद्रिये जागृतावस्थेत असताना तुम्ही कधी एखाद्या झाडाकडे त्या दृष्टीने पाहिलंय का ? समुद्र, पर्वत, टेकड्या, दऱ्याखोऱ्या–सर्वांकडे ? जर बघू शकलात तर मग तुमच्या दृष्टीचा कोणताही विशिष्ट केंद्रबिंदू नसेल. तुमच्या सर्व ज्ञानेंद्रियांना परिपूर्ण अनुभूति मिळेल, नियंत्रित, मर्यादित अशी नव्हे. तुम्हाला हे जोवर स्वच्छपणे आकलन होत नाही तोवर तसे म्हणणे धोक्याचे ठरेल. कारण आपल्यापैकी बहुतेकांना इंद्रियज्ञान हे सीमित स्वरूपात होते – एखाद्याला कपड्यांमध्ये रूची असेल पण फर्निचरच्या निवडीत मुळीच गती नसेल. तुम्हाला कळलं ना ? आज आपण जसे वागतो त्यात इंद्रियज्ञान मर्यादित आहे. इतर कोणीही, कुठल्याही धर्माने, तत्त्वज्ञानाने असे वक्तव्य केलेले नाही. *सर्व ज्ञानेंद्रिये एकत्रपणे उमलायला हवीत आणि ती तशी उमलतानाच जगातील सौंदर्याची जाणीव व्हावी.*

*Mind Without Measure*, नवी दिल्ली १९८२, भाषण ३

# रंग हा येथे ईश्वर होता

थंडीचा कडाका फार जोराचा होता. पाणी गोठण्याइतके उष्णतामान खाली घसरले होते. कुंपणाची झुडपे थंडीने पिवळी पडून गेली होती. झाडाची पिंगट पाने खाली गळून पडली होती. राखीव हिरवळीचा रंग जमिनीप्रमाणेच मातकट-राखी होऊन गेला होता. गुलाबाची व पॅन्सीची पिवळी फुले सोडली, तर सारी बाग उजाड दिसत होती. थंडी फारच कडक होती.

नेहमीप्रमाणे गरीब लोकांची अतिशय दुर्दशा होती. कडाक्याच्या थंडीमुळे कित्येक मृत्युमुखी पडत होते. इकडे लोकसंख्या झपाट्याने वाढत होती व तिकडे थंडीमुळे लोक मृत्युमुखी पडत होते. कितीतरी गरीब माणसे कुडकुडताना दिसत होती. त्यांच्या अंगावर नेहमीचे साधे, फाटकेमळके कपडेच काय ते होते. एक म्हातारी थंडीने नखशिखांत थरथरताना दिसत होती. हुडहुडी भरल्याने तिचे उरलेसुरले दात वाजत होते. तिकडे एक तरुण स्त्री त्या थंडगार नदीत आंघोळ करीत होती व एक फाटका कपडा धूत होती. पलीकडे एक म्हातारा जोरजोराने खोकत होता. पण मुले मात्र मजेत खेळत होती, हसत होती व जोरजोराने आरोळ्या मारीत होती – हा हिवाळा विशेषच कडक होता असे सर्वजण सांगत होते. थंडीने गारठून अनेक गरीब लोक दररोज मरत होते – ते लाल गुलाबाचे फूल व ते पिवळे पॅन्सीचे फूल विशेष जिवंत वाटत होते. रंगवैभवाने ती फुले लसलसत होती. त्या फुलांवरून दृष्टी काढावीशीच वाटत नव्हती. तो लाल व तो पिवळा हे दोन्हीही रंग विस्तारत गेले व त्यांनी ती सारी बाग व्यापून टाकली – पलीकडे मुले आनंदाने आरोळ्या मारीत खेळत असली, तरी ती कुडकुडणारी म्हातारीच सगळीकडे पसरत असल्यासारखे वाटले, त्या फुलाचे ते विलक्षण लसलसणारे लाल व पिवळे रंग आणि त्या म्हातारीचा तो अटळ मृत्यू. रंग हा येथे ईश्वर होता. आणि मृत्यू हा ईश्वराच्या पलीकडचा होता. मृत्यूही सगळीकडे होता व रंगही. ते दोन वेगवेगळे करता येणे शक्य नसते. तुम्ही जर ते वेगवेगळे करून टाकलेत, तर तेथे जीवनही उरत नाही. प्रीती व मृत्यू याचीही ताटातूट तुम्हाला करता येत नसते. अशी ताटातूट जर तुम्ही केलीत, तर तेथे मग सौंदर्य उरत नाही.

सामान्यत: प्रत्येक रंग हा वेगवेगळा मानण्यात येत असतो व प्रत्येकाचे वेगवेगळे कौतुक करण्यात येत असते. पण वस्तुत: रंग हा एकच आहे. अनेक रंग नाहीत. तुम्ही जेव्हा प्रत्येक रंगाकडे केवळ रंग म्हणून पाहाल, तेव्हाच तेथे रंगाचे वैभव व सौंदर्य वसत असलेले तुम्हाला दिसेल. लाल गुलाबाचा व पिवळ्या पॅन्सीचा रंग हे वस्तुत: वेगवेगळे नव्हते. तर त्या उजाड बागेला रंगवैभवाचे अपूर्व लेणे प्राप्त करून देणारा रंगच काय तो होता. आकाशाचा रंग फिका निळा होता. तो पर्जन्यरहित अशा कडक हिवाळ्याचा निळा रंग होता. पण तो सगळ्या रंगांचा निळा रंग होता. तुम्ही त्याच्याकडे पाहिलेत मात्र आणि तुम्ही तो रंगच बनून गेलात. आता शहरात कानी पडणारे नाना प्रकारचे आवाज हळूहळू ओसरून गेले, पण तो अविनाशी रंग मात्र तेथे नांदतच राहिला.

*दैनंदिनी,* २१ जानेवारी १९६२

# ही सर्वश्रेष्ठ कला आहेः समग्र जीवन कौशल्याने जगणे

*प्रश्नकर्ता* :– कलाकार म्हणजे काय हा मला प्रश्नच पडतो. मला अनेकदा आश्चर्य वाटते की, चित्रकार, शिल्पकार, संगीतकार, लेखक – अशा तथाकथित सर्जनशील कलावंतांना एवढे अवास्तव महत्त्व का दिले जाते, जे जोडे बनविणाऱ्याला किंवा स्वयंपाक करणाऱ्याला मिळत नाही, ते सुद्धा सर्जनशील नसतात का ? लोकांच्या मते ज्या तऱ्हेतऱ्हेच्या अभिव्यक्ती सुंदर मानल्या जातात त्यांचा विचार केला की वाटते की खऱ्या कलाकाराचे जीवनात काय स्थान आहे, आणि खरा कलाकार कोण ? सौंदर्य हे साऱ्या जीवनाचे सारभूत आहे, असे म्हटले जाते. त्या तिथे असलेली ती इमारत, जी इतकी सुंदर समजली जाते, ती त्या सारभूताची अभिव्यक्ती आहे का? आपण जर या साऱ्या सौंदर्य आणि कलाकाराच्या प्रश्नाचे विवरण केलेत तर फार बरे वाटेल.

*कृष्णमूर्ती* :– खरोखरच, कलाकार तो असतो जो कृती करण्यामध्ये तरबेज असतो ना? ही कृती जीवनाच्या आत घडत असते आणि जीवनाबाहेर नव्हे, तेव्हा कुशलतापूर्वक जगणेच खऱ्या अर्थाने कलाकार तयार करते. हे कसब किंवा कला ज्यावेळी तुम्ही एखादे वाद्य वाजवित असता, कविता करत असता किंवा चित्र रंगवित असता त्या दिवसातील काही तासांपुरतीच अस्तित्वात असते, किंवा तो जर आणखीन काही कलांमध्ये तरबेज असेल तर तिथेही थोडेफार कसब दाखवू शकेल– जसे पुनरुज्जीवनाच्या (Renaissance) काळात काही थोर माणसांनी अशा अनेक क्षेत्रांमध्ये मोठं काम केलं आहे. परंतु काही तासांपुरतं संगीत किंवा लिखाण त्याच्या, असंतुलित किंवा गोंधळ निर्माण करणाऱ्या, इतर जगण्यामध्ये जर विरोध निर्माण करीत असेल, तर असा मनुष्य हा मुळी कलाकार असतोच का? जो मनुष्य व्हायोलिन कलात्मकतेने वाजवतो आणि त्याचा डोळा त्याला मिळणाऱ्या प्रसिद्धीवर जर असेल तर त्यास व्हायोलिनमध्ये रस नसतो. तो फक्त प्रसिद्धी मिळविण्यासाठी व्हायोलिनचा उपयोग करतो. 'मी' हा संगीतापेक्षा फार महत्त्वाचा असतो. आणि तीच गोष्ट लेखकांची किंवा चित्रकारांची जे प्रसिद्धीवर डोळा ठेवून असतात. संगीतकार त्याचा 'मी' किंवा 'अहं', ज्याला तो उत्तम संगीत मानतो त्याच्याशी जोडतो आणि धार्मिक मनुष्य त्याच्या मते जे उदात्त त्याच्याशी त्याचा 'अहं' जोडतो. हे सर्व त्यांच्या विशिष्ट संकुचित क्षेत्रामध्ये कुशल असतात. परंतु जीवनाचे बाकीचे विशाल क्षेत्र दुर्लक्षित राहिलेले असते. म्हणून आपल्याला कृतीमधील कुशलता म्हणजे काय आहे हे शोधून काढले पाहिजे; जगण्यातील कुशलता – केवळ चित्र रंगविण्यातील किंवा लेखनातील किंवा तंत्रज्ञानातील नव्हे तर आपण आपले संपूर्ण जीवन कुशलतापूर्ण आणि सौंदर्यदृष्टीने कसे जगू शकू. कौशल्य आणि सौंदर्य एकच आहेत का? मनुष्य – तो कलाकार असो किंवा नसो तरी त्याचे संपूर्ण जीवन कुशलतेसह आणि सौंदर्यदृष्टीने जगू शकेल का? जगणं म्हणजेच कृती असते आणि कृती जेव्हा दु:ख निर्माण करते तेव्हा ती कृती कुशल असत नाही, तर मग मनुष्य दु:खाशिवाय जगू शकतो का? घर्षणाशिवाय, लोभ आणि मत्सराशिवाय, कुठच्याही प्रकारच्या संघर्षाशिवाय? कोण कलाकार आहे आणि कोण कलाकार नाही हा मुद्दा नाही. परंतु मनुष्य, तुम्ही किंवा दुसरा कोणीही, छळणूक आणि विपर्यास, विकृतीशिवाय जगू शकतो का, हा मुद्दा आहे. अर्थातच महान संगीताला, थोर शिल्पाला, महत् काव्याला किंवा नृत्याला कमी लेखणे, त्यांना नाक मुरडणे हे अतिशय वाईट आहे; ते तर आपल्या स्वत:च्याच जगण्यात अकुशल असणे आहे. परंतु कलात्मकता आणि सौंदर्य – जी कृतीमधील कुशलता असते, ती संपूर्ण दिवसभर कार्यशील असली पाहिजे, केवळ दिवसातील काही तासांपुरती नव्हे. हेच खरे आव्हान आहे. केवळ पियानो छान वाजविणे नव्हे. तुम्ही जर पियानोला हात लावीतच असाल तर तो सुंदर वाजविलाच पाहिजे, पण ते पुरेसे नाही. ते म्हणजे एका मोठ्ठाल्या शेतातल्या लहानशा कोपऱ्याची मशागत केल्यासारखे होईल. आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आहे ते संपूर्ण शेत आणि ते शेत म्हणजे जीवन आहे. आपण नेहमी संपूर्ण क्षेत्राकडे दुर्लक्ष करतो आणि आपल्या किंवा इतरांच्या काही तुकड्यांवर लक्ष केंद्रित करतो.

कलात्मकता म्हणजे संपूर्णपणे सजग असणे आणि म्हणूनच संपूर्ण जीवनामधील कृतीमध्ये कुशल असणे, आणि हेच सौंदर्य आहे.

*प्रश्नकर्ता* :– मग कारखान्यातील कामगार किंवा ऑफिसातील कर्मचाऱ्यांचे काय? तो कलाकार असतो का? त्याच्या कामाचे स्वरूप त्याच्या कृतीमध्ये कौशल्य असणे अशक्य करते आणि त्याला इतके निर्जीव, बधीर बनविते की त्याला इतर काही कौशल्याने करण्याचीही कुवत राहत नाही, नाही का? तो त्याच्या कामाने संस्कारित असतो ना?

*कृष्णमूर्ती* : नक्कीच असतो. परंतु तो जर जागा झाला तर तो एकतर त्याचे काम सोडून देईल किंवा त्यात असा बदल करील की ते कलात्मक बनेल. ते काम महत्त्वाचे नाही तर कामाबद्दल जागृत होणे महत्त्वाचे आहे. व्यवसायाचे संस्कार महत्त्वाचे नाहीत तर जागे होणे महत्त्वाचे आहे...

.... आपल्याला माहित आहे ती फक्त सकारण कृती, एक उद्देश, त्यातून उद्‌भवणारी कृती. सारी कृती ही नातेसंबंधात असते. नाते जर काही कारणावर आधारित असेल तर ते लुच्चेपणाने जुळवून घेणे असते, आणि म्हणून त्या नात्याची आणखीन एका नीरस रूपात परिणती होणे अटळ असते. प्रेम ही एकच अशी गोष्ट आहे जिला कारण नाही, जी मुक्त आहे, ते सौंदर्य आहे, कौशल्य आहे, कला आहे. प्रेमाशिवाय कला नाही. जेव्हा कलाकार सुंदरतेने वाजवित असतो तेव्हा तेथे 'मी' नसतो, तेथे प्रेम आणि सौंदर्य असते, आणि ती कला आहे. ते कृतीतील कौशल्य असते. कृतीतील कौशल्य म्हणजे 'मी'चा अभाव. कला म्हणजे 'मी'चा अभाव. परंतु जेव्हा तुम्ही जीवनाच्या संपूर्ण क्षेत्राकडे दुर्लक्ष करता आणि फक्त छोट्या भागावर लक्ष केंद्रित करता – 'मी' जरी कितीही गैरहजर असला तरीही तुम्ही कौशल्याने जगत नसता आणि म्हणून तुम्ही जीवनाचे कलाकार नसता. जगण्यामध्ये 'मी'चा अभाव म्हणजे प्रेम आणि सौंदर्य, जे आपले स्वत:चे कौशल्य आणते.

ही सर्वश्रेष्ठ कला आहे : जीवनाच्या संपूर्ण क्षेत्रामध्ये कौशल्याने जगणे.

*The Urgency of Change 'Beauty and the Artist'*

तुम्ही जर 'जे आहे' ते पाहिलेत तर तुम्ही विश्व पाहता, आणि 'जे आहे' त्याला नाकारणे हेच संघर्षाचे मूळ आहे. विश्वाचे सौंदर्य 'जे आहे' त्यात आहे; आणि 'जे आहे' त्याबरोबर राहणे हा सद्‌गुण आहे.

*The Urgency of Change, 'What is'*

# प्रेरणा ही मीपणातून येता कामा नये

**कृष्णमूर्ती :** सौंदर्य म्हणजे काय ते तुम्ही विचारीत होता, जे मन भग्न, खंडित झालेले नसते, त्याच मनात सौंदर्य असते असे मला वाटते.

**पुपुल जयकर :** त्याचा इंद्रियांच्या जाणिवेशी काही संबंध असतो का? तुम्ही कान व डोळे बंद केलेत तर...?

**कृ. :** ते त्या जाणिवेपासून स्वतंत्र असते. तुम्ही जेव्हा कान, डोळे इत्यादींचे मार्ग बंद करता तेव्हा त्या मनाला फाटे फुटत नाहीत. म्हणून त्याच्या ठायी सुंदरतेचा, संवेदनशीलतेचा भाव असतो. बाह्य सुरेखपणावर, सौंदर्यावर ते अवलंबून नसते. अशा मनाचे उपकरण (वाहन, शरीर) एखाद्या शहराच्या गडबडीने भरलेल्या गोंगाटात जरी राहिले तरी काय होते? शारीरिक पातळीवर त्रास होतो, पण खंडित नसलेल्या अशा त्या मनाच्या गुणवत्तेवर काही परिणाम होत नाही, आसमंतातील गोष्टींपासून ते स्वतंत्र असते, म्हणूनच अभिव्यक्तीशी त्याला काही कर्तव्य नसते.

**पु.ज. :** ही त्या मनाची केवलता होय.

**कृ. :** म्हणूनच सौंदर्य ही केवलस्थिती असते. अभिव्यक्ती करण्याची 'स्व'ची ही धडपड का बरे असते ? स्त्रीला अपत्यप्राप्तीबद्दल वाटणारी आस, प्रेमाच्या नाजूक क्षणी पुरुषाला वाटणारी विषयासक्ती, तसेच स्वत:ला व्यक्त करण्याची कलावंताची धडपड, असले सर्व हव्यास हे सौंदर्याचेच भाग असतात काय ?

साक्षी मनाला एखाद्या तरी प्रकारे अभिव्यक्ती करण्याची जरूरी असते का ? त्याला तशी जरूरी नसते, कारण साक्षीत्व हीच मुळी अभिव्यक्ती असते, कृती असते. पाहणे हेच कर्म होते. कलावंत, चित्रकार, वास्तुशास्त्रज्ञ हे स्वत:चेच प्रकटीकरण करून ते शोधतात. पण हे एकांगी असते व म्हणून ही अभिव्यक्ती म्हणजे सौंदर्य नसते.

जे मन संकुचित, संस्कारांनी जखडलेले आणि भंग पावलेले असते ते जरी सौंदर्याचा त्याला जाणवलेला अंश प्रकट करीत असले तरी ते पूर्वसंस्कारितच असते. ते सौंदर्य म्हणावयाचे का ? म्हणून मीपणा– जे पूर्वसंस्कारित मन आहे – ते सौंदर्याचा साक्षात्कार कधीही करू शकत नाही आणि ते मन जे जे काही प्रकट करणार ते ते त्याच्याच गुणधर्माचे असणार.

**पु.ज. :** तुम्ही या प्रश्नाच्या एका पैलूचे उत्तर अजून दिलेले नाही. सृजनशील बुद्धिमत्ता म्हणून काहीतरी गुण असतो; वस्तूंची सुंदर व आल्हाददायक सुबक रचना करण्याची कला हा तो गुण होय.

**कृ. :** गृहिणी भाकऱ्या भाजत असते, अगदी मन लावून – पण तिथे काहीतरी स्वार्थी हेतू नसेल व पूर्ण तन्मयता असेल तेव्हाच, जरासा जरी त्यात हेतू आला की घसरलेच सगळे.

**पु.ज. :** आनंद निर्मिती...

**कृ. :** पण कोणताही दुसरा हेतू साधणे नसले तरच! व्यासपीठावरून वक्ता बोलतो तो त्याला आनंद मिळतो म्हणून नव्हे.

पाण्याचा झरा अखंड असतो, तो कधी आटत नाही, तो आपला झुळझुळ वाहतच असतो. लोक त्याचे पाणी दूषित करोत किंवा जलदेवता म्हणून त्याची पूजा करोत. तो आपला वाहत असतो.

स्वत:च्याच अंतरंगाचे प्रकट स्वरूप दाखविण्याची ज्यांची धडपड असते, त्यांचा त्यात काहीतरी स्वार्थच असतो आणि मीपणानेच विभिन्नता येत असते. मीपणा नसतो तेथेच सत्य दर्शन असते, तीच कृती असते, तेच सौंदर्य असते.

घारापुरी येथील महेशमूर्तीचे शिल्प घडविणाऱ्या शिल्पकाराने ते चिंतनातून घडविले असले पाहिजे, असे मला नक्की वाटते – पाषाणावर छिन्नी टेकविण्यापूर्वी वा कविता लिहिण्यासाठी कागदावर लेखणी टेकण्यापूर्वी, आधीच चिंतनशील अवस्था असली पाहिजे. प्रेरणा ही मीपणातून येता कामा नये.

**पु. ज. :** प्राचीन भारतीय मूर्तिकाराची परंपराच तशी होती.

**कृ. :** आणि सध्या मात्र छोटे मोठे चित्रकार, बहुधा स्वत:चीच अभिव्यक्ती करणाऱ्यांच्या वर्गात मोडतात.

'स्व'चा संपूर्ण त्याग म्हणजेच सौंदर्य असते आणि 'स्व'चा पूर्ण अभाव म्हणजेच 'तत्‌'चे सत्य अस्तित्व. पण होते काय की 'स्व'चा भोज्या न सोडता आपल्याला 'तत्‌' मात्र हवे असते आणि सृजन हे मग पोकळ आणि दिखाऊ मात्र होते.

*परंपरा आणि परिवर्तन*, संवाद १

---

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णमूर्तींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*

**Krishnamurti Foundation India**

Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai - 400 006.

Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com

Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006.*
*Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net • Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*